

# वार्तापत्र













## एप्रिल २०२१

**समर्थन प्रकाशन**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☎०२२-२२००३०६०

🖂: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **डॉ. आशिष भोसले**

संपादन : **मुक्ता भारती व हिंदप्रभा कर्वे**

विश्लेषण
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
सहाय्य
**स्नेहा घरत** -८४८५८९४४६३

प्रसिद्धी
**मनोज सातवी** -९२७३७९६९९९

मांडणी
**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई

सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

## लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.




## शोकाकुलः 'श्रमजीवी संघटना' व 'समर्थन' परिवार

*श्रमजीवी संघटना, रायगड जिल्हा सरचिटणीस संजय भाऊ गुरव यांचे दि. ३ एप्रिल, २०२१ रोजी अकाली निधन झाले, ऐन तारुण्यातच आदिवासी जनतेसाठी काम करण्याचे ध्येय त्यांनी उराशी बाळगले होते. सन २००९ मध्ये श्रमजीवी संघटनेत दाखल झाल्यानंतर आदिवासींमधील सर्वात वंचित, आदिम घटक असलेल्या कातकरी समाजाचे मोठे संघटन, कातकरी नेतृत्त्व त्यांनी रायगड जिल्ह्यात उभे केले. आपल्या कार्य कौशल्याने कातकरी समाजाचे अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावले होते.*

*आपल्या लहानशा आयुष्यात, आपल्या कार्याने हजारो कार्यकर्त्यांना प्रेरणा देऊन जाणाऱ्या या श्रमजीवीच्या सैनिकाला हा अंक कृतज्ञतापूर्वक अर्पण...*

***

## सुखाशी भांडतो आम्ही...
## संजय गुरव यास श्रद्धांजली...



**जगाची झोकूनी दुःखे सुखाशी भांडतो आम्ही..**

असे कविवर्य सुरेश भट यांनी म्हंटल्या प्रमाणे, जगाची दुःखे झेलत सुखाशी भांडणाऱ्या कलंदरांची फौंज म्हणजे संघटना. आज त्या फौंजेतील बिनीचा शिलेदार अकाली जग सोडून गेला.

श्रमजीवी संघटनेच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती प्राणप्रिय असते. कुटुंबाचा गाडा हाकताना या प्रिय जनाना कधी रागवावे लागते, कधी दटावावे लागते. असे सगळे रागावणे, दटावणे ज्या वेळी त्यातील एखादी व्यक्ती जग सोडून जाते त्यावेळी आठवून अंतःकरण विदिर्ण करून टाकते. आज संजय च्या जाण्याने माझे अंतः करण छिनवीच्छिन्न झाले आहे. साऱ्या आठवणी दाटून येत आहेत.

आपल्या पेक्षा वयाने छोट्या असणाऱ्या व्यक्तीचे जाणे तर फारच वेदना दायी असते. दहा वर्षा पूर्वी महादू जाबर अपघातातून बरा होत असतानाच जसा निघून गेला, अगदी तसाच जगण्याला हूलकावाणी देऊन संजय गुरुव सुद्धा आज गेला. ज्यांच्या खांद्यावर आपण जायचे त्यांनाच खांदा द्यायला लागण्याचे दुःख वैऱ्यालाही देऊ नये.

संघटनेचे कुटुंब इतके एकजीव असते की एकाला ठेच जरी लागली तरी दुसऱ्याच्या डोळ्यात पाणी यावे. आपापसात कितीही बोलू, प्रसंगी भांडुही परंतू संकटात मात्र सारे एक हीच भावना गेली चाळीस वर्षे जोपासली गेली.

संजय गुरव असाच केंव्हातरी 11-12 वर्षांपूर्वी संघटनेच्या कुटुंबात सामील झाला. रायगड जिल्ह्याची जबाबदारी त्याने उचलली. कातकरी बहुल असलेला हा जिल्हा संघटनेसाठी एक आव्हान होता. संजय ने संघटनात्मक कौशल्याचा वापर करीत आज पनवेल, खालापूर, सुधागड आणि कर्जत या तालुक्यात संघटनेची मुळे घट्ट रोवली. तेथील कातकरी नेतृत्व उभे केले. दळी जमिनी, आदिवासींच्या बिगर आदिवासीनी बळकावलेल्या जमिनी, सिडको ने डावलेले आदिवासींचे अधिकार, वेठबिगारी या सारख्या प्रश्नावर त्याने रान उठविले. प्रशासनाशी कधी संघर्ष तर कधी उत्तम संवाद करून प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न केला.

संजय बोलण्यात अघळपघळ होता. मुद्द्यावर यायला त्याला वेळ जाई. म्हणून मी अनेकदा त्याला रागावलो. कुडाळ तालुक्यातील कडावल गावाचा रहिवासी तो. तोच कोकणी हेल, कोकणी बाज त्याचा बोलण्यात आणि वागण्यातही असे. "संजय, दोष लोकांना देऊ नकोस, त्यांना बदलण्या आधी आपण बदलू", हे मी त्याला अखंड समजावीत असे. प्रश्नाच्या बाबतीत आणि आदिवासींवर होणाऱ्या

अन्यायाविरोधात तो पेटून उठत असे. दिवस रात्रीची तमा न बाळगता तो त्याचे निराकरण करताना देह भान विसरत असे. आपण वेळेत खात नाही याचा त्याला अभिमान वाटे, तेंव्हा मात्र मी त्याला दटावत असे, ओरडतही असे. " जेव्हा मिळेल तेंव्हा, जे असेल ते खावे, जेंव्हा नसेल तेंव्हा उपाशी राहू. कधी खायला मिळेल हे कुणास ठाऊक, त्यामुळे जेंव्हा जे असेल ते तरी खात जा " असे माझे पालूपद सुरूच असे, अगदी काही दिवसापूर्वी सुधागडला गेलो होतो तो पर्यंत.

संजय अचानक आजारी झाल्याचे योगिता दुर्गेने फोनवर कळविले दोन दिवसापूर्वी. त्यावेळीच तो अत्यवस्थ होता. पनवेल मधील पॅरामाउंट हॉस्पिटल मधून हिंदुजा ला हलवीण्याची अवस्था नव्हती. नेरुळ मधील डी वाय पाटील रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरु झाले, सुरुवातीलाच यशाची खात्री नव्हती, परंतू शक्य ते सर्व उत्तमात उत्तम करण्याविषयी डॉक्टरांशी बोललो, आणि रात्री शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. त्याचे छोटे आतडे सडले होते, लिव्हर आणि किडनी सुद्धा खराब झाली होती. फुफ्फुसेही निकामी होत चालली होती, रक्तदाब लागत नव्हता. शास्त्रक्रिये नंतर कदाचित जीवदान मिळू शकेल अशी अंधुक आशा होती म्हणून तोही निर्णय घेतला. रात्री 2 वाजता शस्त्रक्रिया यशस्वी झाली, याचा अर्थ त्या दरम्यान त्याचा प्राण गेला नाही इतकेच. आणि दुपारी 12 च्या दरम्यान त्याने अखेरचा श्वास घेतला.

संजय सारखे कार्यकर्ते तन मन अर्पण करुन समाजासाठी झटतात, तेंव्हाच संघटना उभी राहते, आणि गोरगरिबांना आशेचा किरण दिसतो. संजयने उभे केलेले सहकारी संघटना पुढे नेतील, मात्र संजयची उणीव त्यांना आणि मला सतत जाणवत राहील. दटावण्यासाठी हक्काचा संजय नसेल.

त्याची पत्नी अनुराधा, चौथित शिकणारा मुलगा अभिषेक आणि अकरावीत शिकणारी मुलगी अपर्णा यांना संघटना अनाथ करणार नाही. ते सर्व संघटनेच्या कुटुंबातील सदस्य आहेत. संजय ची उणीव त्यांना सतत जाणवत राहील.

हे दुःख सहन करण्याची शक्ती विठ्ठलाने त्यांना आणि त्याच्या मातापित्याना द्यावी, आणि संजयच्या आत्म्यास चिरशांती मिळावी म्हणून प्रार्थना.

भाऊ

**विवेक पंडित**

०४ एप्रिल २०२१

संपादकीय

## मानवी हक्कांचे जतन होण्यासाठी,
## आजही 'समर्थन' 'श्रमजीवी' सारख्या संस्था-संघटनांची आवश्यकता!!

थोर समाज सुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांची ११ एप्रिल रोजी १९४वी जयंती साजरी केली तर १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३०वी जयंती आपण साजरी करीत आहोत. या दोन महान समाजसुधारकांच्या स्मृतीस प्रथम विनम्र अभिवादन... महात्मा ज्योतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोहोंचे विचार आणि कृती आजही असंख्य भारतीयांना प्रेरणा देते आणि यापुढेही देत राहणार आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या दोन महान विभूतींनी केलेले कार्य, आज अतुलनीय ठरले आहे. त्या कार्याचा वसा समर्थनने देखील पुढे चालविला आहे. याची कल्पना आपल्याला कोविड-१९ सारख्या जागतिक महामारीत अधिक प्रकर्षाने जाणवते. या कठीण काळात जगभर सामाजिक संस्था-संघटनांनी केलेले कार्य हे अनन्यसाधारण राहिले आहे. म्हणुनच म्हणावे लागते की, 'समर्थन' 'श्रमजीवी' सारख्या सारख्या संस्था संघटनांची समाजाला आजही आवश्यकता आहे.

कोरोना महामारीमुळे गेल्या वर्षभरात भारतासह जगभर दारिद्रय रेषेखाली लोकसंख्येत प्रचंड वाढ झाली आहे. या काळात मध्यमवर्गीयातील मोठा गट आर्थिक दृष्ट्या आकसला असून या या वर्गातील करोडो नागरिक गरिबीच्या खाईत लोटले गेले आहेत. यात आफ्रीका व आशिया खंडातील लोकांचा समावेश अधिक आहे. भारताचा विचार केला तर ३२ टक्के मध्यमवर्गीयांना या काळात गरिबीकडे लोटले. आपल्याकडे १९९१ नंतर प्रथमच मध्यम वर्गात झालेली ही घट सर्वाधिक राहिली आहे. तसेच जो वर्ग नुकताच गरिबीतून मध्यम वर्गात प्रवेश करत होता, तो वर्ग पुन्हा एकदा आपल्या मूळ गरीब या चौकटीत ढकलला गेला आहे, तर गरीब व दारिद्र्यरेषेखालील वर्गाची जी वाताहत झाली, त्याचे मोजमापच होऊ शकलेले नाही, असे संख्याशास्त्र विषयाला वाहिलेल्या 'प्यू रिसर्च सेंटर' (Pew Research Center) या अमेरिका, वाशिंगटन स्थित जागतिक संघटनेने नुकत्याच प्रकाशित केलेल्या अहवालात म्हटले आहे.

भारताचा विचार करायचा झाला तर, कोरोना संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी दि.२४ मार्च, २०२०ला भारतात जनसामान्यांना कोणतीही कल्पना नसताना टाळेबंदी (LOCK DOWN) जाहीर करण्यात आली. अचानक जाहीर केलेल्या टाळेबंदीमुळे सर्व जनजीवन जिथल्या तिथे ठप्प झाले. सर्व प्रकारची सार्वजनिक वाहतूक बंद झाली. खाजगी वाहतुकही बंद झाली. एवढेच नव्हे तर अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांशिवाय इतरांना घराबाहेर पडण्याची बंदी घातली गेली. उद्योग-व्यवसाय बंद पडले.

ज्यांना शक्य होते, त्यांनी महिन्याभराचा किराणा व इतर अत्यावश्यक वस्तू घरात साठवून ठेवल्या. परंतु हातावर पोट असणारा जो असंघटित, असुरक्षित मजूर वर्ग आहे. त्याचे हाल सुरू झाले. महाराष्ट्रात स्थलांतरित मजुरांच्या निर्माण झालेल्या प्रश्नाने या काळात गंभीर रूप धारण केले होते. अशा कठीण काळात या स्थलांतरित असंघटित मजुरांना हात देण्याचे, आदिवासी कष्टकरी जनतेला न्याय मिळवून देण्याचे कार्य अनेक संस्था-संघटनांनी, आपापल्या ताकदी प्रमाणे व निरनिराळ्या स्तरावर केले व आजही करीत आहेत, त्यांच्या या कार्याला 'समर्थन'कडून मानाचा झिंदाबाद.

'समर्थन' सादर करीत असलेल्या एप्रिल, २०२१च्या वार्तापत्रात, 'समर्थन'ने मागील वर्षभरात विधिमंडळ, मंत्रालय, राज्य मानवी हक्क आयोग, राज्य माहिती आयोग व मुंबई महानगरपालिका या विविध स्तरावर विविध उपेक्षित समाजघटकांना त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे जे कार्य केले. त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये कोविड-१९ काळात, निर्माण झालेल्या प्रश्नांना प्रसारमाध्यमे व सामाजिक माध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे, प्रश्नांवर विविध क्षेत्रात चर्चा घडवून आणणे, विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहचविणे, राज्य पातळीवरील अधिकाऱ्यांकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे, आवश्यक असल्यास न्याय यंत्रणेकडे दाद मागणे, केंद्राच्या माहितीचा अधिकार कायदा २००५च्या कायद्याचा प्रभावी वापर करणे, मिळालेल्या माहितीच्या आधारे ते प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करणे असा बहुआयामी राहिला आहे.

'समर्थन'ने मानवी हक्कांचे जतन व संवर्धन करण्यासाठी मोठे कार्य करून ठेवले आहे, लोकांमध्ये मानवी हक्कांबाबत जागरुकता निर्माण व्हावी, आयोगाची संकल्पना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी कार्यशाळा, परिसंवाद, वर्तमानपत्रातून लेख, शिबिर यासारखे कार्यक्रम राबविले गेल. अशा तऱ्हेने राज्यात मानवी हक्क आयोग स्थापन व्हावा म्हणून सर्वोत्परी प्रयत्न केले.परंतु आज २०२१चा विचार करता या आयोगांची स्थिती उत्साहवर्धक नाही असे दिसून येते. 'समर्थन'ने केंद्राच्या माहितीचा अधिकार २००५चा उपयोग करून मिळवलेल्या माहितीत वर्ष २०२०च्या अखेरपर्यंत २० हजार ८३६ प्रकरणे प्रलंबित असून वर्षभरात केवळ १ हजार ८३ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. याचे मुख्य कारण आयोगाच्या रिक्त जागा भरण्यात शासनाने केलेले दुर्लक्ष त्यामुळे हा 'मानवी हक्क आयोग' आज नावापुरता उरला आहे.

जी अवस्था मानवी हक्क आयोगाची तीच अवस्था 'राज्य माहिती आयोग' व त्यांच्या राज्यभरातील खंडपीठांची झाली आहे. आजच्या घडीला राज्याच्या मुख्य माहिती आयोग व त्यांच्या खंडपीठात ६५ हजार द्वितीय अपिलातील अर्ज प्रलंबित असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली

आहे. सुदृढ लोकशाही निर्मितीसाठी सुजाण व माहितगार नागरिकांची आवश्यकता असते. त्यामुळे राज्य व केंद्र शासन व त्यांच्या अखत्यारीतील येणाऱ्या संस्था यांच्याकडून माहिती पाहिजे असेल तर अर्ज करून ती माहिती मिळविता येते. मात्र त्यांच्याकडून माहितीच मिळालेली नाही वा मिळालेली माहिती असमाधानकारक असेल तर प्रथम अपील करता येते. मात्र तरीही समाधान झाले नाही तर, मुख्य माहिती आयोग व त्याच्या खंडपीठांकडे द्वितीय अपील करता येते. वरील ६५ हजार प्रलंबित प्रकरणे ही ज्या अर्जदारांना प्रथम अपीलात मूळ प्राधिकरणाकडून माहिती मिळाली नाही वा त्या माहितीने समाधान झालेले नाही अशा अर्जदारांची आहेत. राज्यातील हे नागरिक आजही माहितीच्या प्रतिक्षेत आहेत.

आधीच आर्थिक मंदीच्या गर्तेत सापडलेली राज्याची अर्थव्यवस्था कोविड-१९ महामारीच्या प्रकोपामुळे पूर्णपणे कोलमडून गेली आहे. शेती व संलग्न क्षेत्र वगळता वस्तू निर्माण, बांधकाम व्यवसाय, साठवण, मनोरंजन, हॉटेल्स, दळणवळण व दगडखाण क्षेत्राच्या उत्पन्नात मोठी घट झाली आहे. बेरोजगारीचा दर एप्रिल, २०२० मध्ये २०.९ टक्क्यांवर गेला होता. २०२१मध्ये अर्थव्यवस्थेची गाडी रुळावर येत असताना नुकत्याच आलेल्या कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे राज्याची अर्थव्यवस्था पुन्हा हेलखावे खाऊ लागली आहे. २०२०-२१ मध्ये राज्याची राजकोषीय तूट ८७ हजार कोटी रुपयांवर गेली असून महसुली तूट ४६ हजार कोटी रुपयांवर पोहोचली आहे. आज राज्यावर ६ लाख १५ हजार कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे. त्यामुळे पायाभूत सुविधा, शिक्षण, अनुसूचित जाती-जमातींसाठी असलेल्या योजनांवर त्याचा अनिष्ट परिणाम झाला आहे.

राज्य शासनाचे सर्व विभाग व जिल्हा परिषदांच्या रिक्त पदांची माहिती घेतली असता आजच्या घडीला २ लाख पदे रिक्त आहेत. रिक्त पदांमुळे ग्रामीण व दुर्गम भागात आरोग्याच्या सुविधांपासून नागरिकांना वंचित राहावे लागत आहेत. डॉक्टर-परिचारिकांची पदे रिक्त असल्यामुळे प्रशिक्षित कर्मचारी वर्गाची वाणवा असल्यामुळे खाजगी रुग्णालयात लोाकांना जावे लागते. तिथे रुग्णांची आर्थिक पिळवणूक होते, तर अनेक मातांना योग्य वेळेत मदत न मिळाल्यामुळे, प्रसुती दरम्यान आपले प्राण गमवावे लागत आहेत. सामाजिक न्याय व आदिवासी विभागांच्या योजनांची अंमलबजावणी अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे प्रभावीपणे होत नाही व अनेक गरजू, गरीब लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. हे वेळोवेळी न्यायालयाने शासनाला दरडावून सांगून सुद्धा रिक्त पदे भरली जात नाहीत, हे आजचे वास्तव आहे. तर दुसऱ्या ठिकाणी मुंबईसारख्या महानगरात कोविड-१९च्या महामारीत आपले प्राण पणाला लावून कोरोना विरोधात लढा देणाऱ्या आरोग्य स्वयंसेविकांना किमान वेतन दिले जात नाही. त्यासाठी त्यांना कामगार आयुक्तांकडे दाद मागावी लागते. मात्र दाद मागूनही त्यांना न्याय मिळत नाही. एका ठिकाणी राज्याचे

मुख्यमंत्री या आरोग्य स्वयंसेविकांचे कौतुक करतात, तर दुसऱ्या ठिकाणी ३९ हजार कोटी रुपयांचे बजेट असणारी मुंबई महानगरपालिका मात्र आरोग्य स्वयंसेविकांसाठी ४० कोटी रुपये देऊ शकत नाही. ही लाजिरवाणी बाब मुंबई महानगरपालिका पत्राद्वारे कळवते. यावरून कामगारांचे कसे शोषण सुरू आहे याची कल्पना येते.

या सर्वांमध्ये एक आशेचा किरण म्हणजे, या कठीण काळातही सामाजिक संस्था-संघटना करीत असलेली कामे खरोखर लोकशाही मूल्यांना बळकटी देणारे आहे. श्रमजीवी संघटना व त्यांच्या कार्यकर्त्यांनी टाळेबंदी काळात व टाळेबंदी नंतरही पालघर, ठाणे, नाशिक व रायगड जिल्ह्यात ५१ हजार कुटुंबांना उपासमारीपासून वाचिवण्यासाठी अन्न-धान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. जव्हार येथील 'बाल संजीवनी छावणी' या कार्याची साक्षीदार बनली आहे. कारण या छावणीतून देखील संघटनेच्या कार्यकर्त्यांनी हजारो कुटुंबांना अन्न-धान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले गेले. कोरोना काळातही 'बाल संजीवनी छावणी'ने आपले काम अविरत सुरू ठेवले आहे. त्यामुळे पालघर जिल्ह्यातील शेकडो कुपोषित व व्याधीग्रस्त बालकांना जीवदान मिळाले आहे. या सर्व प्रकरणांचा आढावा या वार्तापत्रातून घेण्याचा प्रयत्न केला आहे. मागील महिन्याच्या वार्तापत्राप्रमाणे याही वार्तापत्राला चांगला प्रतिसाद द्याल ही अपेक्षा आहे.

सदर वार्तापत्रातील माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू. प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे. 'समर्थन' प्रकाशित करीत असलेल्या माहितीबाबत अधिक जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी 'समर्थन' स्वीकारीत आहे.

धन्यवाद.

***

**संपर्क व प्रतिक्रिया**: ——————————————————————-

————————————————————————————

————————————————————————————

————————————————————————————

————————————————————————————

# लोकशाहीचा आधारवड असलेल्या माहिती अधिकार कायद्याची स्थिती केविलवाणी

सुदृढ लोकशाहीच्या निर्मितीसाठी सुजाण व माहितगार नागरिकांची आवश्यकता आहे व त्यासाठी ज्यांना केंद्र व राज्य शासन आणि त्यांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या संस्था यांच्याकडून माहिती पाहिजे असेल तेव्हा केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार, २००५चा उपयोग केला जातो. परंतु आज या माहिती अधिकार कायद्याची प्रत्यक्ष स्थिती काय आहे. जर माहिती मिळण्यासाठी शासन दरबारी अर्ज करणाऱ्या व्यक्ती व संस्था-संघटनेला माहिती उपलब्ध होते का? जर होत नसेल तर त्याची कारणे काय आहेत?

हे शोधण्याचा प्रयत्न 'समर्थन'ने केला. त्यात 'समर्थन'ला जी माहिती उपलब्ध झाली ती धक्कादायक असून गंभीर स्वरुपाची आहे. कारण आज शासनाकडे माहिती मिळविण्यासाठी हजारो अर्ज येत असतात. परंतु त्या प्रत्येक अर्जावर सकारात्मक कार्यवाही होत नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे त्यापैकी काही जण प्रथम अपील दाखल करतात, परंतु जर पहिल्या अपिला नंतरही आवश्यक माहिती उपलब्ध झाली नाही तर, राज्याच्या मुख्य माहिती आयोगाकडे व खंडपीठाकडे दुसरे अपील केले जाते. मात्र हे दुसरे अपील केल्यानंतरही संबंधितांना न्याय मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्याची काही कारणे ही आयोग, खंडपीठ, विभाग व शासकीय संस्था यामध्ये असलेले रिक्त जागांचे वाढते प्रमाण हे देखील आहे.

***

# राज्य मुख्य माहिती आयोग व राज्यातील खंडपीठांकडे, द्वितीय अपिलातील ६५ हजार अर्जदार माहितीच्या प्रतिक्षेत

## पुणे खंडपीठाकडे सर्वात जास्त २५ टक्के अर्ज प्रलंबित

'समर्थन'ने महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय मुंबई याच्याकडून २०१६ ते २०२० या ५ वर्षाच्या कालावधीतील दाखल झालेले द्वितीय अपील त्यापैकी निकाली काढलेली अपील, प्रलंबित अपील तसेच माहिती मुख्यालयात व राज्यातील सर्व खंडपीठात पदांची स्थिती काय आहे. या प्राधिकारणांना काम करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध आहे का? याबाबतची सर्व माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागितली होती. त्यानुसार राज्याच्या माहिती आयोगाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## अ) महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई यांच्याकडून माहिती अधिकाराच्या द्वितीय अपिलाबाबत  प्राप्त माहिती :

तक्ता क्र. १

| विभाग | द्वितीय अपील वर्षनिहाय | | | | | | प्रलंबित प्रकरणांचे प्रमाण २०२० अखेर % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रकरण | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ | २०२० | |
| मुंबई (मुख्यालय) | प्राप्त | ७,६७७ | ८,६२५ | १०,१९४ | १४,४३५ | १२,८७३ | १४.५० |
| | निकाली | ७,०४७ | ४,६५१ | १,८८० | ३,७३३ | ३,४४९ | |
| | **प्रलंबित** | **६३०** | **३,९७४** | **८,३१४** | **१०,७०२** | **९,४२४** | |
| बृहन्मुंबई | प्राप्त | ७४०६ | ७५५३ | ६०६० | ८९५१ | ७,५२० | ९.९० |
| | निकाली | ५,९४१ | ६,९०४ | ५,१७९ | ३,३२२ | १,०८६ | |
| | **प्रलंबित** | **१,४६५** | **६४९** | **८८१** | **५,६२९** | **६,४३४** | |
| कोकण | प्राप्त | ९,७२० | १०,०९२ | ८,८०० | ७,८९९ | ६,२३५ | ६.३९ |
| | निकाली | ४,४५१ | ५,९२० | ५,०६७ | ४,०६० | २,०७८ | |
| | **प्रलंबित** | **४,८१९** | **४,१७२** | **३,७३३** | **३,८३९** | **४,१५७** | |
| पुणे | प्राप्त | १२,७४२ | १३,६८४ | १३,०३९ | १४,८५४ | १७,१५३ | २५.४३ |
| | निकाली | ४,४७७ | ५,८१९ | ३,३२७ | १,९५९ | ६२५ | |
| | **प्रलंबित** | **८,२६५** | **७,८६५** | **९,७१२** | **१२,८९५** | **१६,५२८** | |
| औरंगाबाद | प्राप्त | ८,२१६ | ११,२३२ | १२,३८७ | ११,८५८ | १४,७७३ | १३.३८ |
| | निकाली | २,५३७ | ६,९३९ | ११,१७१ | ५,४७० | ६,०७४ | |
| | **प्रलंबित** | **५,६७९** | **४,२९३** | **१,२१६** | **६,३८८** | **८,६९९** | |
| नाशिक | प्राप्त | १०,६७७ | १४,९८८ | १३,५७२ | १०,४४२ | ९,०३३ | ११.३१ |
| | निकाली | ४३७ | ४,८५१ | ७,११५ | ४,३०९ | १,६८४ | |
| | **प्रलंबित** | **१०,२४०** | **१०,१३७** | **६,४५७** | **६,१३३** | **७,३४९** | |
| नागपूर | प्राप्त | ३,९९३ | ४,८०७ | ४,६९९ | ४,३७९ | ५,४४१ | ६.७४ |
| | निकाली | २,८७० | ३,९५३ | ३,८९२ | १,३२३ | १,०६२ | |
| | **प्रलंबित** | **१,१२३** | **८५४** | **८०७** | **३,०५६** | **४,३७९** | |
| अमरावती | प्राप्त | १०,२०९ | १०,६९७ | १०,५८६ | १०,८९४ | ११,२१३ | १२.३५ |
| | निकाली | ३,४२३ | ३,५०९ | ३,०१२ | २,३०२ | ३,१८७ | |
| | **प्रलंबित** | **६,७८६** | **७,१८८** | **७,५७४** | **८,५९२** | **८,०२६** | |
| एकूण | प्राप्त | ७०,१९० | ८१,६७८ | ७९,३३७ | ८३,७१२ | ८४,२४१ | १०० |
| | निकाली | ३१,१८३ | ४२,५४६ | ४०,६४३ | २६,४७८ | १९,२४५ | |
| | **प्रलंबित** | **३९,००७** | **३९,१३२** | **३८,६९४** | **५७,२३४** | **६४,९९६** | |

*(स्त्रोत: महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय यांच्याकडून दि. १ मार्च, २०२१ रोजी प्राप्त माहिती.)*

- ☞ वर्ष २०२०च्या अखेर पर्यंत मागील प्रलंबित व नव्याने दाखल झालेले मिळून द्वितीय अपिलांची संख्या ८४ हजार २४१ इतकी मोठी होती. त्यापैकी १९ हजार २४५ (२२.८५%) अपील निकाली काढण्यात आले. तर ६४ हजार ९९६ (७७.१५%) अर्ज आज पर्यंत प्रलंबित राहिले आहेत.
- ☞ वर्ष २०२० अखेरीस सर्वात जास्त द्वितीय अपील प्रलंबित अर्जाचे प्रमाण पुणे खंडपीठात असून, १६ हजार ५२८ अर्ज प्रलंबित राहिले आहेत. एकूण ६४ हजार ९९६ प्रलंबित अर्जांच्या तुलनेत हे प्रमाण २५.४३% आहे.
- ☞ महाराष्ट्र राज्य माहिती आयोग मुख्यालयात प्रलंबित द्वितीय अपिलांची संख्या ९ हजार ४२४ इतकी असून एकूण ६४ हजार ९९६ प्रलंबित अपिलाच्या तुलनेत हे प्रमाण १४.४२% आहे. द्वितीय अपील प्रलंबित राहण्याचे प्रमाण हे पुणे खंडपीठानंतर महाराष्ट्र राज्य माहिती आयोगात सर्वात अधिक आहे.
- ☞ औरंगाबाद खंडपीठ ८ हजार ६९९ (१३.३८%), अमरावती खंडपीठ ८ हजार २६ (१२.३५%), नाशिक ७ हजार ३४९ (११.३१%), बृहन्मुंबई ६ हजार ४३४ (६.३९%), नागपूर ४ हजार ३७९ (६.७४%) व कोकण ४ हजार १५७ (६.३९%) द्वितीय अपील प्रलंबित आहेत.

***

## मुख्य माहिती आयोगासह राज्यातील आयोगाची खंडपीठे कर्मचाऱ्यांविना

### शासन रिक्त पदे भरण्याकडे करतेय दुर्लक्ष

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग मुख्यालयाकडून स्वत: आयोग व राज्यातील बृहन्मुंबई, कोकण, अमरावती, पुणे, नागपूर, नाशिक व औरंगाबाद या खंडपीठांकडून या कार्यालयांसाठी मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे यांची माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागितली होती. त्या प्राप्त झालेल्या माहितीनुसार आयोगासह सर्व खंडपीठांच्या आस्थापनांची स्थिती गंभीर आढळून आली. त्यामुळे या कार्यालयातही द्वितीय अपील प्रलंबित राहण्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहेत.

राज्य मुख्य माहिती आयोग यांनी केलेल्या खुलाशानुसार मुख्यालयातील रिक्त पदांविषयी सांगताना इतर खंडपीठांच्या कार्यालयापेक्षा प्रशासनिक, अर्थसंकल्पीय कामकाज व अन्य प्रकारच्या कामांचे एकत्रीकरण करण्याच्या कामाचा तसेच आयोगाच्या विविध खंडपीठांच्या शासनाकडे पाठवावयाच्या प्रस्तावांच्या कामाचा अतिरिक्त बोजा असतो, सद्यस्थितीत ही कामे सध्या उपलब्ध असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडूनच करवून घेण्यात येत असून रिक्त पदे भरली न गेल्याने त्यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. रिक्त पदांच्या परिणामी तक्रारी/अपील यांच्या सुनावणीच्या कामासाठी पुरेसे मनुष्य उपलब्ध होत नाही. त्यामुळे आयोगाच्या दैनंदिन कामावर परिणाम होतो. हे पाहता आयोगाच्या सर्व कार्यालयातील रिक्त पदे त्वरित भरण्याची गरज आहे असे सांगितले आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे. त्यावरून आपल्याला द्वितीय अपील व तक्रारी प्रलंबित का राहत आहेत याची कल्पना येते. थोडक्यात अर्ज प्रलंबित राहणे याचा अर्थ आपण अर्जदाराला न्याया पासून वंचित ठेवणे असा होतो.

**ब) महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय व इतर खंडपीठ कार्यालयांतील पदांची सद्यस्थिती:**

**तक्ता क्र. २:**

| विभाग | पद | पद नाम | | | | | | | | | रिक्त पदांचे प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सचिव | उप सचिव | अवर सचिव | कक्ष अधिकारी | उ.श्रे. लघुलेखक | नि.श्रे. लघुलेखक | स.क. अधिकारी | लिपीक/ टंकलेखक | एकूण | |
| **मुख्यालय** | मंजूर | १ | - | १ | २ | १ | १ | ५ | ४ | १५ | ८०.०० |
| | भरलेली | ० | - | ० | १ | ० | ० | २ | ० | ३ | |
| | **रिक्त** | **१** | **-** | **१** | **१** | **१** | **१** | **३** | **४** | **१२** | |
| **मुंबई** | मंजूर | - | १ | - | २ | १ | १ | ४ | ४ | १३ | ६१.५४ |
| | भरलेली | - | १ | - | १ | ० | १ | १ | १ | ५ | |
| | **रिक्त** | **-** | **०** | **-** | **१** | **१** | **०** | **३** | **३** | **८** | |
| **कोकण** | मंजूर | - | १ | - | २ | १ | १ | ३ | ५ | १३ | ५३.८५ |
| | भरलेली | - | १ | - | २ | ० | ० | ३ | ० | ६ | |
| | **रिक्त** | **-** | **०** | **-** | **०** | **१** | **१** | **०** | **५** | **७** | |
| **नाशिक** | मंजूर | - | १ | - | २ | १ | १ | ४ | ४ | १३ | १५.३८ |
| | भरलेली | - | १ | - | २ | ० | ० | ४ | ४ | ११ | |
| | **रिक्त** | **-** | **०** | **-** | **०** | **१** | **१** | **०** | **०** | **२** | |
| **पुणे** | मंजूर | - | १ | - | २ | १ | १ | उ.ना. | ४ | ९ | ५५.५५ |
| | भरलेली | - | ० | - | २ | ० | १ | उ.ना. | १ | ४ | |
| | **रिक्त** | **-** | **१** | **-** | **०** | **१** | **०** | **उ.ना.** | **३** | **५** | |
| **औरंगाबाद** | मंजूर | - | १ | - | २ | १ | १ | ४ | ४ | १३ | १५.३८ |
| | भरलेली | - | १ | - | १ | ० | १ | ४ | ४ | ११ | |
| | **रिक्त** | **-** | **०** | **-** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **२** | |
| **अमरावती** | मंजूर | - | १ | - | २ | १ | १ | ४ | ४ | १३ | ३०.७७ |
| | भरलेली | - | १ | - | २ | ० | ० | ३ | ३ | ९ | |
| | **रिक्त** | **-** | **०** | **-** | **०** | **१** | **१** | **१** | **१** | **४** | |
| **नागपूर** | मंजूर | - | १ | - | २ | १ | १ | ४ | ४ | १३ | ३८.४६ |
| | भरलेली | - | १ | - | २ | ० | १ | ३ | १ | ८ | |
| | **रिक्त** | **-** | **०** | **-** | **०** | **१** | **०** | **१** | **३** | **५** | |
| **एकूण** | मंजूर | १ | ७ | १ | १६ | ८ | ८ | २८ | ३३ | १०२ | ४४.१२ |
| | भरलेली | ० | ६ | ० | १३ | ० | ४ | २० | १४ | ५७ | |
| | **रिक्त** | **१** | **१** | **१** | **३** | **८** | **४** | **८** | **१९** | **४५** | |

*(**स्रोत:** महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय यांच्याकडून दि. १ मार्च, २०२१ रोजी प्राप्त माहिती.)*

☞ महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय व बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक,औरंगाबाद, अमरावती व नागपूर या खंडपीठांमध्ये १०२ पदे मंजूर असून त्यापैकी ५७ (५५.८८%) पदे भरण्यात आली आहेत, तर ४५ (४४.१२%) पदे रिक्त आहेत.

☞ महाराष्ट्र राज्य माहिती आयोगात सचिव व अवर सचिवाचे पदही रिक्त आहे.

☞ माहिती आयोग मुख्यालयात १५ पदे मंजूर असून केवळ ३ (२०%) पदे भरली गेली आहेत, तर १२ (८०%) पदे रिक्त आहेत.

☞ पुणे खंडपीठात ९ पदे मंजूर असून ४ (३३.४४%) पदे भरली गेली आहेत, तर ५(५५.५६%) पदे रिक्त आहेत.

☞ बृहन्मुंबई खंडपीठात १३ पदे मंजूर असून ५ (३८.४६%) पदे भरली गेली आहेत, तर ८ (६१.५४%) पदे रिक्त आहेत.

☞ कोकण ७ (५३.८५%) पदे, नागपूर ५ (३८.४६%) पदे, अमरावती ४ (३०.७७%) नाशिक २ (१५.३८%) व औरंगाबाद २ (१५.३८%) पदे रिक्त आहेत.

☞ वरील सर्व कार्यालयात लिपिक व टंकलेखकांची ३३ पदे मंजूर असून त्यापैकी केवळ १४ (४२.४२%) पदे भरली गेली आहेत तर १९ (५७.५८%) पदे रिक्त आहेत.

रिक्त पदांबाबत उपलब्ध झालेल्या माहिती सोबत पदे रिक्त राहण्याची जी कारणे आयोगाने दिली आहेत तसेच तळटीप जोडली आहे, त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा केला असल्याचे सांगितले आहे. त्याचप्रमाणे आयोगाचे अनेक कर्मचारी हे प्रतिनियुक्तीवर आहेत. प्रतिनियुक्तीचा कालावधी ५ ते १० वर्षे इतका मोठा राहिला आहे. तर काही कर्मचारी हे प्रतिनियुक्तीवर असताना सेवानिवृत्त झालेले आहेत. पुणे खंडपीठात श्री. किरण सुर्यवंशी अतिरिक्त सचिव, मंत्रालय, मुंबई यांची खंडपीठात उप सचिव पदावर १ वर्ष कालावधीसाठी नियुक्ती झालेली असताना, तसा शासन निर्णय निर्गमित झालेला असताना, सदर पदावर श्री. सुर्यवंशी अद्यापी हजर झालेले नाहीत. ही मुख्य माहिती आयोग व राज्यभरातील खंडपीठांची शोकांतिका आहे.

***

## राज्य शासनाच्या सर्व विभाग व जिल्हा परिषद मिळून २ लाख पदे रिक्त

### एकट्या गृह विभागात २४ हजार ८४८ पदे रिक्त

### जिल्हा परिषदांमधील रिक्त पदांची संख्या पोहोचली ४७ हजारांवर

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेल्या माहितीनुसार आज राज्यामध्ये राज्य शासनाच्या अखत्यारितील १० लाख ९९ हजार १०४ मंजूर पदांपैकी ८ लाख ९८ हजार ९११ पदे भरली गेली असून २ लाख १९३ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचा अनुशेष दरवर्षी वाढतच असून या अनुशेषामुळे सर्वसामान्य जनतेला सेवा पुरवताना त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहेत. अनेक चांगल्या योजनांची अंमलबजावणी अधिकारी व कर्मचारी वर्ग नसल्याने योग्य पद्धतीने होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

राज्याच्या सर्वांगीण विकासात विविध विभागात असलेल्या रिक्त पदांमुळे प्रतिकूल परिणाम झालेला आहे. कृषि विभागातील रिक्त पदांमुळे अनेक अधिकाऱ्यांना प्रभारी पद वा अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे ते मूळ पदासहित प्रभारी पदाला देखील न्याय देऊ शकत नाही हे सिद्ध झाले आहे. आरोग्य विभागातील डॉक्टरर्स, परिचारिका यांच्या रिक्त पदांमुळे रुग्णांना आर्थिक व शारीरिक नुकसान सोसावे लागत आहे. आदिवासी विकास विभागातील रिक्त जागांमुळे अनेक योजना निधी असूनही त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. आदिवासी उपयोजनेचा विचार केला तर वर्ष २०२०-२१ मध्ये डिसेंबर, २०२० पर्यंत ९ महिन्यात एकूण निधीपैकी केवळ २५ टक्के निधी खर्च झाला आहे. तर सामाजिक न्याय विभागाच्या घटक कार्यक्रमाचा वर्ष २०२०-२१ मध्ये जानेवारी, २०२१ पर्यंत केवळ २० टक्के निधी खर्च झाला आहे. रिक्त जागा या राज्याच्या विकासात मोठा अडसर निर्माण करीत असल्याची बाब निदर्शनास आली असताना, शासन रिक्त जागा भरण्याकडे लक्ष देत नसल्याचे निदर्शनास आले आहे. 'समर्थन'ने राज्यातील रिक्त जागांबाबत मिळवलेली माहिती पुढीलप्रमाणे.

**क) राज्यातील सर्व संवर्गातील मंजूर, भरलेली व रिक्त पदांची माहिती:**

**तक्ता क्र. ३:**

| अक्र. | विभाग | मंजूर | भरलेली | रिक्त | मंजूर पदांशी रिक्त पदांची (%) | रिक्त पदांमध्ये विभागांची (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | गृह | २,९५,२८८ | २,७०,४४० | २४,८४८ | ८.४१ | १२.४१ |
| २. | सार्वजनिक आरोग्य | ६२,६३४ | ४२,०९० | २०,५४४ | ३२.८० | १०.२६ |
| ३. | कृषि व पदुम | ३९,३९४ | २५,०३० | १४,३६४ | ३६.४६ | ७.१८ |
| ४. | महसूल व वन | ८१,१५१ | ६९,८१८ | ११,३३३ | १३.९७ | ५.६६ |
| ५. | आदिवासी विकास | २०,८३६ | १३,४४५ | ७,३९१ | ३५.४७ | ३.६९ |
| ६. | शालेय शिक्षण व क्रीडा | ६,८९९ | ३,४२२ | ३,४७७ | ५०.४० | १.७४ |
| ७. | सामाजिक न्याय | ६,४७९ | ३,६२३ | २,८५६ | ४४.०८ | १.४३ |
| ८. | अन्न, नागरी पुरवठा व ग्रा. संरक्षण | ८,३१० | ५,५७४ | २,७३६ | ३२.९२ | १.३७ |
| ९. | महिला व बाल विकास | ३,९३६ | २,४९१ | १,४४५ | ३६.७१ | ०.७२ |
| १०. | कौशल्य विकास व उद्योजकता | १५,५८० | १०,५२५ | ५,०५५ | ३२.४५ | २.५२ |
| ११. | इतर विभाग | १,९४,२४९ | १,३५,०६७ | ५९,१८२ | ३०.४७ | २९.५६ |
| १२. | विभागाचे एकूण कर्मचारी | ७,३४,७५६ | ५,८१,५२५ | १,५३,२३१ | २०.८५ | ७६.५४ |
| १३. | जिल्हा परिषदा कर्मचारी | ३,६४,३४८ | ३,१७,३८६ | ४६,९६२ | १२.८९ | २३.४६ |
| | **एकूण** | **१०,९९,१०४** | **८,९८,९११** | **२,००,१९३** | **१८.२१** | **१००.००** |

*(**स्त्रोत:** सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून दि. ५ मार्च, २०२१ रोजी प्राप्त माहिती.)*

- ☞ राज्यभरामध्ये सर्व विभाग व जिल्हा परिषदेची मिळून १० लाख ९९ हजार १०४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी, ८ लाख ९८ हजार ९११ (८१.७९) पदे भरली गेली असून २ लाख १९३ (१८.२१%) पदे रिक्त आहेत.
- ☞ राज्यातील २९ कार्यरत विभागांचे मिळून ७ लाख ३४ हजार ७५६ पदे मंजूर असून त्यापैकी, ५ लाख ८१ हजार ५२५ (७९.१५%) पदे भरली गेली आहेत. तर १ लाख ५३ हजार २३१ (२०.८५) पदे रिक्त आहेत.
- ☞ राज्यातील सर्व जिल्हा परिषदांची मिळून ३ लाख ६४ हजार ३४८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी, ३ लाख १७ हजार ३८६ (८७.११%) पदे भरली गेली असून, ४६ हजार ९६२ (१२.८९%) पदे रिक्त आहेत.
- ☞ राज्यात एकूण २ लाख १९३ रिक्त जागा असून त्यापैकी सर्वात जास्त रिक्त जागा जिल्हा परिषदांच्या असून, ४६ हजार ९६२ (२३.४६%) जागा रिक्त आहेत.
- ☞ गृह विभागाच्या २४ हजार ८४८ जागा रिक्त असून, एकूण रिक्त जागांमध्ये गृह विभागाचे प्रमाण १२.४१% आहे.
- ☞ शालेय शिक्षण विभागाची ६ हजार ८९९ पदे मंजूर असून, ३ हजार ४७७ (५०.४०%) पदे रिक्त आहेत.
- ☞ सामाजिक न्याय विभागाचे ६ हजार ४७९ पदे मंजूर असून, त्यापैकी, २ हजार ८५६ (४४.०८%) जागा रिक्त आहेत.
- ☞ महिला व बाल विकास विभागाच्या ३ हजार ९३६ जागा मंजूर असून, १ हजार ४४५ (३६.७१%) जागा रिक्त आहेत.
- ☞ कृषि व पदुम विभागाचे ३९ हजार ३४९ जागा मंजूर असून त्यापैकी १४ हजार ३६४ (३६.४६%) जागा रिक्त आहेत.
- ☞ आदिवासी विकास विभागाच्या २० हजार ८३६ जागा मंजूर असून, त्यापैकी, ७ हजार ३९१ (३५.४७%) जागा रिक्त आहेत.
- ☞ सार्वजनिक आरोग्य विभागात ६२ हजार ६३४ जागा मंजूर असून त्यापैकी २० हजार ५४४ (३२.८०%) जागा रिक्त आहेत.

***

# राज्य मानवी हक्क आयोगात २० हजार ७३७ प्रकरणे प्रलंबित

## वर्ष २०२० मध्ये निकाली काढलेली प्रकरण केवळ ५ टक्के

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना दि. ६ मार्च, २००१ रोजी झाली. भारतीय नागरिकांना संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्कांचे जतन करण्याचे काम आयोग करतो. तसेच त्याच्या प्रचार, संरक्षण आणि अंमलबजावणीची जबाबदारी आयोगावर आहे. सत्तेचा दुरुपयोग होऊ नये, छळ, भेदभाव, वैद्यकीय उपचार नाकारणे, शोषण होऊ नये, कुपोषण कमी व्हावे, लैंगिक अत्याचार रोखणे, सामाजिक न्याय, वेठबिगारी थांबविणे अशा अनेक पातळीवर मानवी हक्क आयोग कार्य करीत असते. सध्या आयोगाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी कार्यवाह म्हणून एम. ए. सईद यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. आयोगाच्या सचिवपदी श्री. तुकाराम मुंढे या कार्यदक्ष अधिकाऱ्याची नेमणूक झाली आहे. आहेत. परंतु विशेष पोलीस महानिरीक्षक व अधीक्षक अशी महत्त्वाची पदे सध्या रिक्त आहे. आयोगाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे आयोगाकडे आज २० हजार ७३७ प्रकरणे प्रलंबित आहेत.

**ड) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगात प्राप्त तक्रारी :**

**तक्ता क्र.४**

| वर्ष | मागील अनिर्णीत प्रकरणे | नविन दाखल प्रकरणे | एकूण प्रकरणे | निकाली काढलेली प्रकरणे | वर्षाच्या शेवटी अनिर्णीत राहिलेली प्रकरणे | एकूण प्रकरणांच्या तुलनेत अनिर्णीत प्रकरणांची (%) | निकाली काढलेल्या प्रकरणांची (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **२०१७** | १६,१५७ | ४,५८५ | २०,७४२ | ५,१८७ | १५,५५५ | ७५.०० | २५.०० |
| **२०१८** | १५,५५५ | ६,७७० | २२,३२५ | ५,३६८ | १६,९५७ | ७५.९६ | २४.०४ |
| **२०१९** | १६,९५७ | ४,६५९ | २१,६१६ | ३,५५९ | १८,०५७ | ८३.५४ | १६.४६ |
| **२०२०** | १८,०५७ | ३,७६३ | २१,८२० | १,०८३ | २०,७३७ | ९५.०४ | ४.९६ |

*(स्त्रोत: मानवी हक्क आयोग, मुंबई यांच्याकडून दि. २६ फेब्रुवारी, २०२१ रोजी प्राप्त माहिती.)*

- ☞ वर्ष २०१७ ते २०२० या ४ वर्षाच्या कालावधीत १९ हजार ७७७ प्रकरणे नव्याने दाखल झाली. तर १५ हजार १९७ (७६.८४%) प्रकरणे निकाली काढली.
- ☞ मागील अनिर्णीत प्रकरणांची संख्या सातत्याने वाढत असून वर्ष २०१७ मध्ये १६ हजार १५७ प्रकरणे प्रलंबित होती त्यात २०२०च्या सुरुवातीला १९०० प्रकरणांची भर पडली असून प्रलंबित प्रकरणांची संख्या १८ हजार ५७ झाली .
- ☞ वर्ष २०२० मध्ये १८ हजार ५७ प्रलंबित प्रकरणे होती त्यात ३ हजार ७६३ प्रकरणे नव्याने दाखल झाली. त्यामुळे एकूण प्रकरणांची संख्या २१ हजार ८२० इतकी झाली त्यापैकी १ हजार ८३ (४.९६%) प्रकरण निकाली काढण्यात आली. तर २० हजार ७३७ (९५.०४%) प्रकरण प्रलंबित होती.

***

# कोविड-१९च्या संकटामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला मोठा फटका

## पायाभूत सोयी-सुविधा, शिक्षण, अनुसूचित जाती-जमाती व मानव विकास यांच्यावरील गुंतवणूक घटली

## कोरोना काळात राज्याची राजकोषीय तूट ८७ हजार ६९७ कोटीं

## तर महसुली तूट पोहोचली ४६ हजार कोटींवर

दि. ८ मार्च, २०२१ रोजी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्याचे वित्त मंत्री मान. श्री. अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणातच म्हटले होते की कोविड-१९च्या जागतिक महामारीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर मागील एका वर्षात अभूतपूर्व प्रतिकूल परिणाम झाला आहे. त्यामुळे राज्यातील उद्योग, सेवा व इतर क्षेत्रामध्ये मोठी घट झाल्याचे म्हटले आहे. अगोदरच आर्थिक मंदीमुळे धोक्यात आलेली अर्थव्यवस्था कोविड-१९ च्या महामारीमुळे पूर्णत: कोलमडून गेल्याची कबुली एकप्रकारे वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात दिली आहे. त्यानुसार राज्याच्या महसुली जमेत मोठी घट झाली असल्याने महसुली खर्चावर देखील मर्यादा आल्या आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर वर्ष २०२१-२२ साठी ४ लाख ८४ हजार ९० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. मागील वर्षीचा अर्थसंकल्प ४ लाख ३४ हजार ८४ कोटी रुपयांचा होता. वित्त विभागाच्या अर्थसंकल्प वितरण व समायोजन प्रणाली (BEAM) या संकेतस्थळावर दि. २६ मार्च, २०२१ रोजी प्राप्त झालेल्या माहितीनुसार त्यापैकी २ लाख ७४ हजार ८५२ कोटी रुपये (६३.३२%) खर्च झाले आहेत. याचाच अर्थ वर्ष २०२०-२१ मध्ये १ लाख ५९ हजार २३२ कोटी रुपये कमी खर्च झाले आहेत. वर्ष २०२०-२१ मध्ये ३ लाख ४७ हजार ४५७ कोटींचे महसुली जमेचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यापैकी २ लाख ८९ हजार ४९८ कोटी रुपये महसूल जमा झाल्याचा सुधारित अंदाज आहे. याचाच अर्थ महसुलात ५७ हजार ९५९ कोटी रुपयांची घट होणार आहे. महसुलातील ही घट १६.६८% आहे. मात्र त्याचवेळेला महसुली खर्च, ३ लाख ३५ हजार ६७५ कोटी झाला आहे. याचाच अर्थ तो महसुली जमेच्या तुलनेत ४६ हजार १७८ कोटीने वाढला आहे. त्यामुळे ४६ हजार १७८ कोटी रुपयांची महसुली तूट आली आहे. तर कर्जे व दायीत्वे मिळून राजकोषीय तूट ८७ हजार ६९७ कोटींवर पोहोचली आहे. भांडवली खर्चाचा विचार केला तर भांडवली जमा रु. ८९ हजार ७९८ कोटी होती, त्यापैकी ४३ हजार ८२८ कोटी खर्च झाला आहे. म्हणजे भांडवली खर्चात ४५ हजार ९७० कोटी (५१.१९%) रुपयांची घट झाली आहे.

वर्ष २०२०-२१चा विचार करता, शेती व संलग्न व्यवसायात ११.७% ने वाढ होणार असली तरी खाण व दगडखाण, वस्तू निर्माण, बांधकाम व्यापार, दुरुस्ती, वाहतूक, साठवण, दळणवळण, मनोरंजन व हॉटेल्स या क्षेत्रावर मोठा आघात झाला असून या क्षेत्रांच्या उत्पन्नात मोठी घट झाली आहे.

राज्याच्या एकूण महसुली जमेमध्ये जी घट आली आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे राज्याच्या स्वत:च्या करात झालेली घट हे आहे. त्यामध्ये राज्य वस्तू व सेवा कर (GST) रु. १९ हजार १४६ कोटी, मुद्रांक व नोंदणी फी (Stamp & Registration Fee) रु. ८ हजार कोटी रुपये, विक्री कर (Sales Tax) रु. ६

हजार कोटी रुपये, राज्य उत्पादन शुल्क (State Excises Duty) रु.४ हजार २२५ कोटी, वाहनांवरील कर (Taxes on Vehicles) रु. ३ हजार ३०० कोटी तर विजेवरील कर व शुल्क (Taxes & Duties on Electricity) रु. १७०० कोटी आहे. करेतर महसुलात रु.५ हजार ३५९ कोटींची घट होणार असून, केंद्रीय करातील हिश्श्यात रु. १४ हजार ३६६ कोटींनी घट अपेक्षित आहे.

वर्ष २०१९-२० या कालावधीत राज्य शासनाला मागील काळातील ज्याचा कालावधी १ ते १० वर्षापेक्षा अधिक आहे. असा रु.१ लाख १३ हजार १९८ कोटींचा कर महसूल तर रु. ४ हजार २७१ कोटी करेतर महसूल जमा करण्यात अपयश आले आहे, हे वास्तव आहे तसेच राज्य शासन विविध विभागांसाठी हमी राहिल्यामुळे राज्य शासनाची रु. ४१ हजार १७९ कोटी रक्कम येणे बाकी होते. आज राज्य शासनाच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढत असून राज्य शासनावर वर्ष २०१९ मध्ये रु. ४ लाख ५१ हजार ११४ कोटींचे कर्ज होते, वर्ष २०२०-२१ मध्ये त्यात रु. ८७ हजार १९० (१९.३३%) कोटींची वाढ झाली असून, ते रु. ५ लाख ३८ हजार ३०४ कोटींवर गेले आहे. वर्ष २०२१-२२ मध्ये ते रु. ६ लाख १५ हजार १७० कोटींवर जाणार असे अंदाज वर्तवण्यात आले आहेत. म्हणजे मागील वर्षाच्या तुलनेत हा कर्जाचा बोजा १४.२८% नी वाढणार आहे.

त्यामुळे राज्य शासनाने अगामी काळात जर महसूल वाढीसाठी उपाययोजना केल्या नाहीत तर, राज्यात वाढत असलेल्या कोरोनाच्या प्रकोपामुळे पुढील काळात सामाजिक न्याय, आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, महिला व बाल विकास या विभागांच्या योजनांच्या खर्चात मोठी घट होणार आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम वंचित-उपेक्षित घटकांच्या विकासावर होणार आहे. त्यामुळे वित्तमंत्र्यांनी जरी रु. ४ लाख ८४ हजार ९० कोटींचा अर्थसंकल्प सादर केला असला तरी, शासनाने येत्या काळात महसूल वाढीसाठी प्रयत्न केले नाहीत तर महसुली तूट भरून काढण्यासाठी मोठी किंमत चुकवावी लागणार आहे.

वर्ष २०२०-२१च्या मानव विकास व सामाजिक सेवांवरील महसुली खर्चात मोठी घट होणार त्याचा परिणाम सामाजिक क्षेत्रांवर मोठा होणार असून शिक्षण रु.७ हजार ३७७ कोटी, पाणी पुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण व नगरविकास रु.६ हजार ९६५ कोटी अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण रु.४ हजार १७० कोटी व कौशल्य विकास रु. ५४८ कोटींनी घट होणार आहे.

त्याचप्रमाणे रोजगार निर्मितीवर या सर्व गोष्टींचा प्रतिकूल परिणाम झाला असून रोजगारात मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. एप्रिल, २०१९ मध्ये बेरोजगारीचा दर ४.१% होता मात्र कोरोनाचा प्रकोप वाढल्यावर टाळेबंदीच्या काळात बेरोजगारीचा दर एप्रिल, २०२०मध्ये १६.८०% ने वाढून २०.९% गेला होता. असे सेंटर फॉर मॉनेटरिंग, इंडिया इकॉनॉमी (CMIE) या संस्थेने म्हटले आहे. त्यात आजही सुधारणा झालेली नाही.

***

# रोजगार हमी योजनेमार्फत होणाऱ्या घरकुल बांधणीच्या कामात होतोय भ्रष्टाचार

## रोहयो अंतर्गत घरकुलांचे काम होऊनही लाभार्थी त्यांच्या घरकुलाचे हप्त्यांपासून वंचित

पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील धामणशेत-कोशिमशेत ग्रामपंचायत हद्दीतील २९ लाभार्थ्यांच्या घरकुलांची कामे, शबरी घरकुल योजना, प्रधान मंत्री आवास योजना तसेच इंदिरा आवास योजना या तीन योजनांची कामे 'रोजगार हमी योजनें'तर्गत सन २०१८ मध्ये झाली आहेत. परंतु या लाभार्थ्यांना आजपर्यंत 'रोजगार हमी योजनें'तर्गत झालेल्या कामाचे हप्ते मिळालेले नाहीत. प्रत्येक लाभार्थ्याला १८ हजार रुपयांप्रमाणे ५ लाख २२ हजार रुपये इतकी रक्कम मिळणे गरजेचे होते. मात्र आजपर्यंत घरकुलांचे बांधकाम होऊनही हे लाभार्थी योजनेच्या आर्थिक लाभापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे या 'रोजगार हमी योजनें'तर्गत घरकुल बांधणीच्या कामात सातत्याने गैरव्यवहार होत असल्याची बाब 'समर्थन'च्या निदर्शनास आली आहे.

याबाबतची तक्रार श्रमजीवी संघटनेचे मोखाडा तालुक्यातील कार्यकर्ते श्री.योगेश धिंडे यांनी 'समर्थन'कडे केली होती. त्यानुसार 'रोजगार हमी योजनें'तर्गत विविध योजनांची घरकुल बांधणीची कामे होत असताना, वर्क-कोड, ई-मस्टर निघणे गरजेचे असते. मात्र सदर प्रकरणात वर्क-कोड व ई-मस्टर न निघाल्यामुळे लाभार्थी घरकुल योजनेंतर्गत मिळणाऱ्या आर्थिक लाभापासून मागील २ वर्ष उलटून गेली तरी वंचित राहिले आहेत. याबाबत धामणशेत-कोशिमशेत ग्रामपंचायतीने गटविकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती, मोखाडा यांच्याकडे दि. ५ जानेवारी, २०१९ रोजी पाठपुरावा केला होता. परंतु तरीही या लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा आर्थिक लाभ मिळालेला नाही. अशा प्रकारचा गैरव्यवहार संपूर्ण जिल्ह्यात होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. कामाचे वर्क-कोड व ई-मस्टर दडविण्याचे प्रकार घडत असून, ही बाब गंभीर आहे.

मस्टर काढण्याची जबाबदारी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (Assistant Programme Officer) यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणात गटविकास अधिकारी (Block Development Office), कार्यक्रम अधिकारी (Programme Officer) तसेच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (Assistant Programme Officer) यांची भूमिका महत्त्वाची असून या सर्वांची विभागीय चौकशी होणे गरजेचे आहे. हे ध्यानात आल्यानंतर 'समर्थन'ने राज्याचे 'रोजगार हमी योजना' मंत्री, मान. श्री. सांदिपान भुमरे यांच्याशी दि. ८ फेब्रुवारी, २०२१ रोजी पत्रव्यवहार केला. त्यानंतर दि. ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी, नियोजन विभाग (रोहयो) स्तरावरून, जिल्हाधिकारी यांना चौकशीचे आदेश देण्यात आले.त्यानंतर दि.२२ फेब्रुवारी, २०२१ रोजी जिल्हाधिकारी पालघर यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (रोहयो), पालघर यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक, जिल्हा परिषद, पालघर यांच्याशी पत्रव्यवहार केला व संबंधित विषयी माहिती सादर करण्याच्या सूचना केल्या. त्याबाबतची कोणतीही माहिती न दिल्यामुळे दि. ८ मार्च, २०२१ रोजी उप जिल्हाधिकारी, (रोहयो) यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा

जिल्हा कार्यक्रम समन्वयक जिल्हा परिषद, पालघर यांना स्मरणपत्र दिले. तसेच उचित कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. मात्र इतके करूनही उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक जिल्हा परिषद, पालघर यांनी आजपर्यंत याबाबतचा अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे सदर २९ लाभार्थी आजही योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

यावरून देशातील नोकरशाहीत भ्रष्टाचार किती भिनला आहे. गैरव्यवहार करूनही आपण कोणालाही जबाबदेही नाही; इतका मस्तवालपणा इथल्या नोकरशाहीत किती रुजला आहे. तसेच वरिष्ठ अधिकारी किती हतबल आहेत, याची कल्पना येते.

***

# कोरोना काळात आपले प्राणपणाला लावून कार्य करणाऱ्या व खुद्द मुख्यमंत्र्यांनी ज्यांच्या कामाचे कौतुक केले; त्या आरोग्य सेविका किमान वेतनापासून वंचित

## ३९ हजार कोटींचे बजेट असणाऱ्या मुंबई महानगरपालिकेकडे आरोग्य स्वयंसेविकांना देण्यासाठी ४० कोटी नाहीत

मुंबई महानगर पालिकेच्या आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या आरोग्य स्वयंसेविकांनी कोरोना काळात प्रत्येकाच्या घरोघरी जाऊन ''माझे कुटुंब, माझी जबाबदारी'' या उपक्रमाचा प्रसार व प्रचाराची जबाबदारी सोपविण्यात आली होती. या काळात कोरोनाचा प्रकोप वाढत असताना झोपडपट्टी, चाळीत इमारतीत व संकुलात जाऊन, आपला जीव धोक्यात घालून आरोग्य विषयक विविध कामे करीत आल्या आहेत. त्यामध्ये जनजागृती करणे, ज्वर तपासणे, श्वासन-श्वास तपासणे, आजारी व्यक्तींना इस्पितळात व क्वारंटाईन केंद्रात भरती करणे अशी कामे केली. कोरोनाची पहिली लाट नियंत्रणात आणण्यात या स्वयंसेविकांनी मोलाची जबाबदारी पार पाडली होती. मान. मुख्यमंत्र्यांनी दूरचित्र वाहिनी व फेसबुक या समाज माध्यमांवर या महिला स्वयंसेविकांचे मोठे कौतुक केले होते. मुंबईतील या महिला स्वयंसेविकांची संख्या ४ हजार इतकी आहे. पल्स पोलियो लसीकरण, मलेरिया व हिवताप याबाबत तपासणी करणे रक्त चाचणी करणे, गरोदर स्त्रियांची नोंद ठेवणे, त्यांना मार्गदर्शन करणे अशी सर्व कामे या आरोग्य सेविका करीत आल्या आहेत.

मुंबईतील आरोग्य सेवेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या आरोग्य स्वयंसेविकांविषयी मुंबई महानगरपालिकेने सवतासुभा स्वीकारल्याचे दिसते. या स्वयंसेवकांना किमान वेतन देखील दिले जात नाही. आपली जबाबदारी चोख पार पाडणाऱ्या या आरोग्य स्वयंसेविकांना किमान वेतन मिळावे यासाठी मान. मुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री, मुंबईचे आयुक्त, मुंबईच्या महापौर यांच्यासोबत या महत्त्वाच्या

विषयावर ‘समर्थन’ने पाठपुरावा केला होता, त्यानुसार मुंबई महानगरपालिका कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार मुंबई महानगरपालिका प्रशासन या आरोग्य स्वयंसेविकांना किमान वेतन देण्यास उत्सुक नसल्याचे दिसून येते.

मुंबईतील या महिला आरोग्य स्वयंसेविकांनी किमान वेतन देण्याबाबत कामगार आयुक्त कार्यालय, बांद्रा कामगार भवन येथे याचिका दाखल केली होती. कामगार आयुक्त यांनी किमान वेतन अधिनियम १९४८ अन्वये कलम २ (ज) नुसार महिला आरोग्य स्वयंसेविकांना मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी म्हणून घोषित केले होते. त्यानुसार कामगार आयुक्तांनी या महिला आरोग्य स्वयंसेविकांना दि. ७ सप्टेंबर, २०२० रोजी मुंबई महानगरपालिकेला किमान वेतन देण्याचे आदेश दिले. मात्र हे आदेश डावलून मुंबई महानगरपालिका मनपाच्या तिजोरीवर ४० कोटी रुपयांचा भार येतो म्हणून मान. उच्च न्यायालयामध्ये अपील दाखल करणार आहे.

आज बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत एकूण अंदाजित लोकसंख्या १ कोटी ८४ लाख एवढी मोठी आहे. यावरून ४ हजार महिला आरोग्य स्वयंसेविकांचे काम किती कठीण आहे याची कल्पना येते. मुंबई महानगरपालिका असो किंवा राज्य शासनाचा आरोग्य विभाग यांनी नेहमीच आरोग्याच्या मूलभूत सोयी-सुविधा व रिक्त जागा याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे राज्यातील नागरिकांना याची किंमत चुकवावी लागली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका ही आशियातील सर्वात मोठी महानगरपालिका असून सर्वात मोठा अर्थसंकल्प असलेली महानगरपालिका आहे. देशातील काही राज्यांच्या तुलनेत या महानगरपालिकेचा अर्थसंकल्प व उत्पन्न अधिक राहिले आहे. आज बृहन्मुंबई महानगरपालिकेचा वर्ष २०२१-२२चा अर्थसंकल्प रु.३९ हजार ३८ कोटी ८३ लाखांचा आहे. तर आरोग्य सेवेवर रु. ४ हजार ७२८ कोटी ५३ लाख (१२.११%) प्रस्तावित करण्यात आले आहेत असे असताना आरोग्य स्वयंसेविकांना किमान वेतन देण्यासाठी ४० कोटी रुपये नाहीत ही बाब अतिशय गंभीर असून आरोग्य व्यवस्थेवर परिणाम करणारी आहे. कोरोना सारख्या कठीण प्रसंगातही, मुंबई महानगरपालिका या कर्मचाऱ्यांकडे कशा पद्धतीने दुर्लक्ष करीत आहे याची कल्पना येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने उच्च न्यायालयात न जाता, या ४ हजार स्वयंसेविकांना किमान वेतन देण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे. यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या महापौरांबरोबर ‘समर्थन’ मार्फत पाठपुरावा केला जाणार आहे.

***

# ७ वर्षात राज्यातील ९ हजार २०८ मातांनी प्रसूती दरम्यान प्राण गमावले

## राज्यातील शहरीकरण होणाऱ्या जिल्ह्यात माता मृत्यूचे प्रमाण वाढले

## बृहन्मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, ठाणे, औरंगाबाद व सोलापूर या ७ जिल्ह्यांतील माता मृत्यूची संख्या ५ हजार ३९१ (५८.५५%) इतकी मोठी

'समर्थन'ने राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांच्याकडून गेल्या ७ वर्षात राज्यात किती मातांना प्रसूती दरम्यान आपले प्राण गमवावे लागले याची माहिती केंद्राच्या माहितीचा अधिकार, २००५ अंतर्गत मागितली होती. त्यानुसार दि. २२ फेब्रुवारी, २०२१ रोजी प्राप्त झालेल्या माहितीनुसार, राज्यातील ३५ जिल्ह्यात ९ हजार २०८ मातांनी प्रसूती दरम्यान आपले प्राण गमावले आहेत. त्यामध्ये सर्वात अधिक मृत्यू हे बृहन्मुंबई जिल्ह्यात १ हजार ७८४ (१९.३७%) इतके मोठे आहे. त्यानंतर नागपूर जिल्हा १ हजार १७६ (१२.७७%), ही बाब अत्यंत गंभीर असून बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच नागपूर जिल्ह्यातील आरोग्य खात्याचे आरोग्यविषयक सोयी-सुविधांकडे दुर्लक्ष झालेले आहे, हे यावरून निदर्शनास येते. त्याचप्रमाणे पुणे - ६९१ (७.५०%), नाशिक-५९६ (६.४७%), ठाणे—४७५ (५.१६%), औरंगाबाद -३३६ (३.६५%) तर सोलापूर- ३३३ (३.६२%) मातांनी आपले प्रसूती दरम्यान आपले प्राण गमावले आहेत.

ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी, निम शहरी भागात प्रसूती दरम्यान मातांचे मृत्यू होण्याचे प्रमाण मोठे आहे. बृहन्मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, ठाणे, औरंगाबाद व सोलापूर या ७ जिल्ह्यात गेल्या ७ वर्षात एकूण ५ हजार ३९१ (५८.५५%) मातांनी आपले प्राण गमावले तर इतर २८ जिल्ह्यांमध्ये ३ हजार ८१७ (४१.४५%) मातांचे प्रसूती दरम्यान मृत्यू झाले आहेत.

प्रसूती दरम्यान ज्या मातांचे मृत्यू होतात त्याची कारणे व प्रमाण नीती आयोगाने जाहीर केले आहे, त्यानुसार रक्तस्त्राव -३०%, अशक्तपणा व कुपोषण - १९%, जखम व त्यात पू होणे - १६%, प्रसूती काळात गुंतागुंत निर्माण होणे -१०%, गर्भपात -९%, रक्तात विष पसरणे - ८% तसेच इतर कारणांमुळे होणारे मृत्यू याचे प्रमाण - ८% राहिले आहे. मातेच्या आरोग्याचा मोठा परिणाम जन्माला येणाऱ्या बाळावर होत असतो. मागील ७ वर्षात राज्यभरातील ० ते ५ वर्षातील १ लाख ३८ हजार बालकांनी आपले प्राण गमावले आहेत. तर फेब्रुवारी ते डिसेंबर, २०२० या ११ महिन्याच्या कालावधीत १२ हजार १७९ अर्भकांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी बृहन्मुंबई - १०९७, नागपूर - ५८७, नाशिक - ६६४, ठाणे -४८७, पुणे - ५५१, औरंगाबाद - ७२९ व सोलापूर - ४९१ इतके आहेत. म्हणजे वरील ७ जिल्ह्यात ४ हजार ६०६ अर्भकांचे मृत्यू झाले आहेत. एकूण अर्भक मृत्यूमध्ये हे प्रमाण ३७.८२% आहे. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका, पुणे, ठाणे, नाशिक, औरंगाबाद व सोलापूर या वेगाने वाढणाऱ्या महानगरपालिकांमध्ये स्थलांतर होऊन येणाऱ्या गरीब मजुरांचे प्रमाण मोठे राहिले आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच आरोग्य विषयक सोयी-सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. त्यामुळे नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे नाहीतर आरोग्याविषयी या जिल्ह्यात भविष्यात गंभीर स्थिती निर्माण होऊ शकते.

***

# जव्हार येथील ‘श्री विठु माऊली चॅरिटेबल ट्रस्ट’ची ‘बाल संजीवनी छावणी’ ठरतेय कुपोषित बालकांसाठी वरदान

## आतापर्यंत शेकडो बालकांना मिळालेय जीवदान

पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर कुपोषणाने दगावणाऱ्या मुलांची संख्या आणि कुपोषण रोखण्यात शासनाला आलेले अपयश पाहून मान. विवेकभाऊ पंडित यांच्या संकल्पनेतून ‘बाल संजीवनी केंद्र’ जव्हार, ही छावणी आकारास आली. या छावणीचा मुख्य उद्देश आदिवासी मुलांमधील वाढत्या कुपोषणावर नियंत्रण मिळवणे हा राहिला आहे. या छावणीचे दि. २६ जुलै, २०१९ रोजी उद्घाटन झाले.

कुपोषणावर मात करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर सामाजिक संस्थेने चालवलेला हा पहिलाच उपक्रम ठरला आहे. त्यामुळे इतर जिल्ह्यासाठीच नव्हे तर कुपोषण असलेल्या प्रत्येक राज्यासाठी ही छावणी दिशादर्शक ठरली आहे. ही छावणी केवळ कुपोषणावर काम करून थांबत नाही तर कुपोषणाचे मूळ ज्याच्यात आहे. ते म्हणजे भूक व बेरोजगारी. रोजगारासाठी सातत्याने होणारे स्थलांतर रोखण्यासाठी कार्यकर्ते सातत्याने काम करीत आहेत. आदिवासींना गावातल्या गावात रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध होतील. शिक्षण व आरोग्य याबाबत समाजात जागृती निर्माण करणे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, त्यातून आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न ही छावणी करीत आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी असताना व टाळेबंदी उठल्यानंतरच्या कठीण काळात गरीब आदिवासींना जगवण्यासाठी महत्त्वाची भूमिका या ‘बाल संजीवनी केंद्र, जव्हार’ने पार पाडली आहे व छावणीचे हे कार्य अहोरात्र सुरू आहे.

कोरोना काळात कुपोषित मुलांचे तपासणी शिबिर आयोजित करण्यास शासनाने बंदी घातली. त्यामुळे ‘बाल संजीवनी केंद्र, जव्हार’ येथे शिबिर आयोजित करता आले नाही. मात्र तरीही दि. ५ ते ६ सप्टेंबर, २०२० रोजी कोगदा, धारणहट्टी व तराळपाडा या जव्हार तालुक्यातील, अंगणवाड्यांवर जाऊन मुलांची तपासणी केली गेली. कोरोनाचा प्रकोप कमी झाल्यानंतर दि. ३ जानेवारी, २०२१ रोजी छावणीवर शिबिर आयोजित करण्यात आले. तर मोखाडा ग्रामीण रुग्णालयात दि. १० फेब्रुवारी, २०२१ रोजी तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्याचा अहवाल पुढीलप्रमाणे.

## ह) वर्ष २०२०-२१ या कालावधीतील ‘बाल संजीवनी केंद्रा’मार्फत केलेल्या कुपोषित मुलांचा तपासणी अहवाल:

**तक्ता क्र. ५**

| दिनांक | अंगणवाडी/ बाल संजीवनी/ ग्रामीण रुग्णालय | अति तीव्र कुपोषित (SAM) | मध्यम तीव्र कुपोषित (MAM) | साधारण (NORMAL) | एकूण (TOTAL) | तपासणीनंतर रुग्णालयात भरती केलेली बालके |
|---|---|---|---|---|---|---|
| ०५-०९-२०२० | कोगदा, जव्हार | २ | ९ | ४२ | ५३ | ० |
| ०६-०९-२०२० | धारणहट्टी, जव्हार | ४ | ५ | २३ | ३२ | ० |
| ०६-०९-२०२० | तराळपाडा, जव्हार | ४ | ३ | ३६ | ४३ | ० |
| ०३-०१-२०२१ | बाल संजीवनी केंद्र | १४ | ४२ | १५ | ७१ | ७ |
| १०-०२-२०२१ | मोखाडा ग्रा. रुग्णालय | ४० | २२ | १६ | ७८ | १३ |
| | एकूण | **६४** | **८१** | **१३२** | **२७७** | **२०** |

*(स्त्रोत: बाल संजीवनी छावणी, जव्हार यांच्याकडील अहवाल, २०२०-२१)*

- ☞ मागील ६ महिन्यात जव्हार मधील तीन अंगणवाडी केंद्र, मोखाडा ग्रामीण रुग्णालय व बाल संजीवनी छावणी मध्ये कुपोषित बालकांसाठी शिबिर आयोजित केले गेले त्यात २७७ बालकांची तपासणी केली गेली.
- ☞ तपासणी केलेल्या २७७ बालकांपैकी, ६४ (२३.१०%) बालके ही तीव्र कुपोषित तर ८१ (२९.२४%) बालके ही मध्यम तीव्र कुपोषित आढळून आली.
- ☞ तपासलेल्या २७७ बालकांपैकी १३२ बालके ही सर्वसाधारण गटातील होती.
- ☞ तपासण्यात आलेल्या २७७ बालकांपैकी २०(७.२२%) बालकांना इस्पितळात उपचारासाठी भरती करण्यात आले.
- ☞ रुग्णालयात भरती करण्यात आलेल्या एकूण २० बालकांपैकी १३ (६५%) बालके ही मोखाडा ग्रामीण रुग्णालयात तपासलेली होती. तर ७ (३५%) बालके ही ‘बाल संजीवनी छावणीत’ तपासलेली होती.
- ☞ २७७ बालकांपैकी मोखाडा ग्रामीण रुग्णालयात तपासलेली ७८ (२८.१५%) तर ‘बाल संजीवनी छावणीत’ तपासलेली ७१(२५.६३%) बालके होती.

***

## ‘बाल संजीवनी छावणी’द्वारे उपचार घेत असलेल्या बालकांचा स्थितीदर्शक अभ्यास अहवाल:

**१) नाव: कु. अर्चना कृष्णा भोये**

**राहणार:** जव्हार, पालघर जिल्हा

**जमात:** कातकरी आदिम जमात.

**कुटुंब:** दारिद्र्यरेषेखालील असून, उदरनिर्वाहासाठी आई-वडिल शेती करतात.

**वय ४ वर्षे: वजन:** ७,१०० कि.ग्रॅ.तीव्र कुपोषित (SAM)

**आजार:** पोटात गाठ व तीव्र कुपोषित

**माहिती कधी मिळाली:** दि. १७ डिसेंबर, २०२०

**उपचारासाठी दाखल:** सायन रुग्णालय, मुंबई येथे उपचार व शस्त्रक्रियेसाठी २१ दिवस दाखल.

**सद्यस्थिती:** सायन रुग्णालय, मुंबई येथे शस्त्रक्रिया झाली असून, आता तिची तब्येत सुधारत आहे.



दि. १९ डिसेंबर, २०२० रोजी सायन रुग्णालयात दाखल करून गाठीची शस्त्रक्रिया करण्यात आली. सदर मुलगी २१ दिवस रुग्णालयात उपचार घेत होती. आता तिची तब्येत सुधारत असून, वजन देखील वाढलेले आहे.

जेव्हा अर्चना विषयी कळले तेव्हा ‘बाल संजीवनी छावणी’च्या प्रमुख श्रीम. सीता घाटाळ व इतर कार्यकर्ते त्या मुलीच्या घरी गेले, मात्र तिचे आई-वडील उपचार करण्यासाठी रुग्णालयात दाखल करण्यासाठी तयार नव्हते. सदर मुलगी निपचित पडून असल्याचे निदर्शनास आले. कार्यकर्त्यांनी ताबडतोब ‘पतंगशहा कुटीर रुग्णालय’ जव्हारचे डॉ. मऱ्हाड याची मदत घेतली. त्यांनी यासाठी मुंबईतील सायन रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. मुलीचे आई-वडील अर्चनाला सायन रुग्णालयात उपचारासाठी न्यायला तयार नव्हते. तरीही कार्यकर्त्यांनी आई-वडिलांना त्या मुलीच्या गंभीर स्थिती विषयी जाणीव करून दिली. त्यानंतर ‘बाल संजीवनी छावणी’चे संस्थापक श्री. विवेकभाऊ पंडित तसेच सल्लागार व तपासणीस बालरोग तज्ज्ञ डॉ. वर्षा भोसले यांच्या सल्ल्याने तिला सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर शस्त्रक्रिया करून तिच्या पोटातील गाठ काढण्यात आली. या दरम्यान ती २१ दिवस दाखल होती. आता ती घरी असून तिच्या औषधांची व्यवस्था ‘बाल संजीवनी छावणी’मार्फत करण्यात

आली आहे. तिचा आहार अंगणवाडीतून दिला जातो. तरी तिच्या प्रकृती स्वास्थ्यावर 'बाल संजीवनी छावणी'चे कार्यकर्ते लक्ष ठेवून आहेत व आता तिची तब्येत सुधारत असून वजन देखील वाढत आहे.

**२) नाव: कु. रुपेश तुकाराम खानजोडे.**

**राहणार:** जव्हार, पालघर जिल्हा

**जमात:** वारली जमात

**कुटुंब:** दारिद्र्यरेषेखालील असून, उदरनिर्वाहासाठी आई-वडिल स्थलांतर करतात.

**वय ३ वर्षे:, वजन:** ६,२०० कि. ग्रॅम. कुपोषित (SAM)

**आजार:** क्षय (T.B.)

**माहिती कधी मिळाली:** दि. १६ फेब्रुवारी, २०२०.

**उपचारासाठी दाखल:** दि. १९ फेब्रुवारी, २०२० रोजी 'बाल संजीवनी छावणी'त दाखल

**किती दिवस:** दि. २७ फेब्रुवारी, २०२० पर्यंत. (९ दिवस)

**सद्यस्थिती:** क्षय रोगातून हा मुलगा बरा झाला असून, आता त्याची तब्येत सुधारत आहे व त्याचे वजन १४ कि. ग्रॅम इतके वाढले आहे.



**कु. रुपेश तुकाराम खानजोडे**

**उपचारापूर्वी व उपचारानंतर**



'बाल संजीवनी छावणी' जव्हार येथे फेब्रुवारी, २०२० मध्ये झालेल्या आरोग्य शिबिरात कु. रुपेश तुकाराम खानजोडे या बालकाला पिंपळकडा, जव्हार येथून तपासणीसाठी आणले होते. डॉ.

वर्षा भोसले यांनी त्याला तपासले असता, त्याला 'क्षय' (T.B.) असल्याची शंका आली. त्यानंतर त्याचा छातीचा एक्स-रे करण्यात आला तेव्हा ही शंका खरी ठरली. त्याला क्षय झाला असल्याचे निदान झाले. त्याचे कुटुंबीय उपचारासाठी त्याला छावणीत दाखल करण्यासाठी तयार नव्हते. कारण त्याचे वडील रोजगारासाठी पालघर तालुक्यात गेले होते. त्यांना फोन करून विचारल्यानंतर त्यांनी आपल्या पत्नीला म्हणजे रुपेशच्या आईला सांगितले की, ''तू तुझ्या जबाबदारीवर ने'', तो मुलगा तीव्र कुपोषित (SAM) होता. त्याच्या आईला याबद्दल समजावून सांगितल्यानंतर ती तयार झाली. त्याला छावणीत उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्याच्या तपासण्या 'पतंगशहा कुटीर रुग्णालय' जव्हार, येथे करण्यात आल्या. त्याचे आजारानुसार उपचार सुरू झाले. त्याला छावणीवर नऊ दिवस देखरेखीखाली ठेवण्यात आले. नंतर आईला त्याच्या औषध कशी घ्यायची त्याला आहार कसा घ्यायचा याची सविस्तर माहिती समजावून सांगितल्यानंतर त्याला घरी सोडण्यात आले.

जव्हार प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण पाटील यांची चांगली मदत झाली. त्यांनी अंगणवाडी कार्यकर्ती व आशा यांच्याकडे या मुलाची विशेष जबाबदारी दिली होती. त्याशिवाय दर आठवड्याला छावणीतील कार्यकर्ते त्याच्या घरी जाऊन त्याच्या आरोग्याची विचारपूस करीत असतात. आज रुपेश कुपोषणाच्या गर्तेतून बाहेर पडला असून, 'क्षय' रोगातून मुक्त झाला आहे. त्याचे वजनही चांगले वाढले आहे. विशेष म्हणजे सुरुवातीला हा मुलगा केवळ बटाटा वेफर्स व नाचणीची भाकरी खायचा आज हा मुलगा सर्व पद्धतीचा आहार घेतो.

**३) नाव: कु. विश्वास श्रीराम भोये.**

**राहणार**: नाशेरा, ता. मोखाडा, पालघर जिल्हा

**जमात**: कातकरी, आदिम जमात.

**कुटुंब**: दारिद्र्यरेषेखालील असून, उदरनिर्वाहासाठी आई-वडिल मजुरी करतात.

**वय २ वर्षे: वजन:** कि.ग्रॅ.

**आजार**: काखेत गाठ होती (Exillary Cystic Hygroma)

**माहिती कधी मिळाली**: दि. १५ मार्च, २०२१.

**उपचारासाठी दाखल**: दि. १७ मार्च, २०२१ रोजी नायर रुग्णालयात दाखल केले.

**किती दिवस**: दि. १७ मार्च, २०२१ पासून आजपर्यंत नायर रुग्णालय, मुंबई येथे दाखल आहे.

**सद्यस्थिती**: त्याच्या काखेच्या गाठीची शस्त्रक्रिया यशस्वी झाली असून, आता त्याची स्थिती सुधारत आहे.



**कु. विश्वास श्रीराम भोये**

**उपचारापूर्वी**
**व**
**उपचारानंतर**



नाशेरा, ता. मोखाडा, जिल्हा पालघर येथे राहणारा कु. विश्वास श्रीराम भोये, वय २वर्षे याच्या काखेत जन्मापासून गाठ होती. ती दुखत नसली तरी ती त्याच्या वयानुसार वाढतच होती. याची माहिती. मोखाड्याचे कार्यकर्ते श्री. रवी धिंडा यांनी श्री. विवेकभाऊ पंडित यांना दिली. माहिती मिळाल्यानंतर लगेचच श्री. विवेक भाऊंनी छावणी वरील कार्यकर्त्यांना नाशेरा येथे जाऊन भेट घेण्यास सांगितले. नंतर त्याच्या आई-वडिलांशी बोलून त्याला लगेच रुग्णालयात दाखल करावे लागेल असे सांगितले. त्याचे पालक यासाठी तयार होत नव्हते. याचा खर्च आम्हाला कसा परवडणार ? त्याशिवाय आमची मजुरी बुडेल ही भीती होती. तरीही त्यांना समजावून त्याला रुग्णालयात दाखल करण्याचे ठरले. डॉ. वर्षा भोसले यांनी त्याला नायर रुग्णालय, मुंबई येथे दाखल करावे लागेल असे सांगितले. त्याबाबतची सर्व प्रकारची मदत डॉ. वर्षा भोसले व डॉ. आशिष भोसले यांनी केली. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर त्याचा एम.आर.ए. करावा लागला. तो जे. जे. रुग्णालय, मुंबई येथे करण्यात आला. सर्व वैद्यकीय प्रक्रिया पार पाडल्यानंतर कु. विश्वासच्या गाठीवर नायर रुग्णालय येथे यशस्वीरित्या शस्त्रक्रिया पार पडली.

**गोर-गरीबांची सेवा करत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या डॉ. वर्षा भोसले व डॉ. प्राची शहा:**



*डॉ. प्राची शहा, मुलांची तपासणी करताना*




*डॉ. वर्षा भोसले, मुलांची तपासणी करताना*

या कामात नायर रुग्णालयाचे डॉ. सुरज गांधी व जे. जे. रुग्णालय, मुंबईचे जावळे यांची मोलाची मदत झाली. यासाठी ‘बाल संजीवनी छावणी’च्या परिचारिका वैशाली कोदे, वसंत वाजे, रेणुका सुरुम तसेच ‘समर्थन’च्या स्नेहा घरत यांची मोठी मदत झाली. आज या मुलाची स्थिती स्थिर असून, त्यात सुधारणा होत आहे.




*‘बाल संजीवनी छावणी’ आरोग्य शिबीर*



*‘बाल संजीवनी छावणी’ उपचार घेणारी बालके*

***

# अन्न ना सन्मान ज्याला प्रेरणा माझी असू दे; आजचे पाऊल माझे त्या प्रभूसाठी पडू दे!

## कोरोना महामारीच्या कठीण काळात गोरगरीबांना छावणीतून झाली अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंची मदत

एप्रिल, २०२० पासून म्हणजे जेव्हा रोजगारासाठी बाहेर पडलेली आदिवासी स्थलांतरित कुटुंब टाळेबंदी नंतर आपल्या घरी परतत होती, अशा कठीण प्रसंगात शासनाचेही कुटुंबांच्या उदरनिर्वाहाकडे दुर्लक्ष झाले होते, त्यावेळेला 'बाल संजीवनी छावणी' जव्हार येथून श्रमजीवी संघटनेमार्फत हजारो कुटुंबांना तांदुळ, डाळी, तसेच तेल, मीठ, हळद, तिखट या जीवनावश्यक वस्तू पुरवण्याचे काम या छावणीच्या माध्यमातून श्रमजीवींच्या कार्यकर्त्यांनी केले.

तब्बल ४० ते ५० कार्यकर्ते दररोज गावा-गावात जाऊन अगदी घरा-घरात जाऊन धान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करीत होते. यामध्ये कुपोषित मुले, भूमिहीन कातकरी कुटुंबे, गरीब आदिवासी त्याचप्रमाणे बिगर आदिवासी कुटुंबांचाही समावेश होता. पहिल्या टप्प्यात या छावणीमार्फत पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, डहाणू, वाडा, विक्रमगड या तालुक्यांसह नाशिक जिल्ह्यामधील १४ हजार ९२२ कुटुंबांना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तू देण्यात आले. तर पुढे दुसऱ्या टप्प्यात ७ हजार ८८६ कुटुंबांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले असे या छावणीच्या प्रमुख कार्यवाह श्रीम. सीता घाटाळ यांनी सांगितले.

कुपोषण निर्मूलनासाठी आरोग्य शिबिर, कोरोना काळात अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, आदिवासींना रोजगार मिळावा यासाठी 'रोजगार हमी योजने'ची प्रभावी अंमलबजावणी व्हावी त्यात सकारात्मक बदल व्हावेत यासाठी छावणी मार्फत अनेक उपक्रम राबविले जात आहेत. आदिवासींसाठी असलेल्या निरनिराळ्या योजनांची माहिती दिली जाते. त्या योजनांचा लाभ मिळावा म्हणून प्रयत्न केले जातात. आज ही छावणी म्हणजे हजारो गोर-गरिब कुटुंबांचे आधारस्थान बनले आहे. त्याचप्रमाणे छावणीच्या या उपक्रमातून शेकडो कार्यकर्ते घडत आहेत.



*'बाल संजीवनी छावणी' अन्नधान्याच्या वाटपाची तयारी*



*गरीब गरजू यांना कार्यकर्त्यांमार्फत अन्नधान्याचे वाटप*

***